आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ ऑगस्ट २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- नागरिकत्व सुधारणा कायदा नागरिकत्व काढून घेणारा नसून नागरिकत्व देणारा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र सरकारची लाडकी बहीण योजना थांबणार नसल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

- संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीसाठी निबे कंपनी रत्नागिरी जिल्ह्यात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार

- कोलकाता इथं महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्येच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयाकडून स्वतःहून दखल / मंगळवारी सुनावणी

**आणि**

- उत्तर प्रदेशात बस आणि पिकअप यांची धडक होऊन १० कामगारांचा मृत्यू, ३७ जण जखमी

**<><><><><>**

नागरिकत्व सुधारणा कायदा नागरिकत्व काढून घेणारा नसून नागरिकत्व देणारा आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज अहमदाबाद इथं आयोजित कार्यक्रमात १८८ हिंदू निर्वासितांना या कायद्यांतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रांचं वाटप केलं. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शहा यांनी काँग्रेसवर टीका केली. मतपेढी आणि अनुनयाच्या राजकारणासाठी काँग्रेसनं हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांकडे दुर्लक्ष केलं, असं ते म्हणाले. नागरिकत्व सुधारणा कायदा देशभर राबवला जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

आज त्यांनी अहमदाबाद महानगरपालिकेच्या १ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकास प्रकल्पांच उद्घाटनही केलं.

**<><><><><>**

लाडकी बहीण योजना थांबणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दिली आहे. ते आज सातारा इथं महिला सशक्तीकरण अभियानात बोलत होते. राज्यातल्या बहिणींना उद्योगशील बनवून लखपती करायचं आहे. तुम्ही जितक्या ताकदीनं सरकारच्या पाठीशी उभे राहाल, तेवढ्या ताकदीने सरकार तुम्हाला मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. साताऱ्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

दुसरे सत्तेवर आले तर ते योजना बंद पाडतील, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात काम करणारी निबे लिमिटेड ही कंपनी या क्षेत्रातल्या वस्तूंच्या निर्मितीसाठी रत्नागिरी जिल्ह्यात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यातून सुमारे एक ते दीड हजार रोजगार तयार होणार आहेत. यासंबंधीचा सामंजस्य करार आज राज्याचा उद्योग विभाग आणि निबे लिमिटेड कंपनी यांच्यात झाला. उद्योगमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. संरक्षणविषयक उत्पादनं, शस्त्रास्त्रं यांचं प्रदर्शन, तसंच संरक्षण क्षेत्रातल्या रोजगाराच्या संधींची माहिती देणाऱ्या व्याख्यानांचं आयोजनही यावेळी केलं होतं.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज चेन्नई इथं भारतीय तटरक्षक दलाच्या सागरी प्रतिसाद केंद्राचं उद्घाटन केलं. या केंद्रामुळे तेलगळती नियंत्रणासाठी त्या

प्रदेशातल्या देशांशी समन्वय साधणं सुलभ होणारं आहे. आसियान देशांतल्या २० कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण उद्यापासून दोन आठवड्यांसाठी आयोजित केलं जाणार आहे. हे केंद्र तेलगळती व्यवस्थापन योजनांचा विकास आणि अंमलबजावणी करण्यासाठी मदत करेल.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी कुवेतचे युवराज शेख सबाह अल खलिद अल सबाह अल हमद अल मुबारक अल सबाह यांची भेट घेतली. भारत आणि कुवेत यांच्यात असणारे जुने मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ होत आहेत असं त्यांनी समाजमाध्यमावर एका पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

एस. जयशंकर आज कुवेतमध्ये दाखल झाले, त्यावेळी कुवेतचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्दुल्लाह अली अल याह्या यांनी त्यांचं स्वागत केलं. या दौऱ्या दरम्यान मध्यपूर्व आणि दक्षिण आशियातल्या भूराजकीय परिस्थितीसह उभय देशाच्या हिताच्या मुद्द्यांवरही वैचारिक आदानप्रदान होणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. भाऊ आणि बहिणींच्या अनोख्या नात्याचा हा सण असून यामुळे प्रेम आणि विश्वासाचं नातं बळकट होतं, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून विविधतेत एकतेचं दर्शन घडवणारा हा सण असून महिलांच्या अधिकारांचं रक्षण करण्याच्या आपल्या प्रतिबद्धतेला बळकटी देणारा हा सण असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्येच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून दखल

घेतली आहे. याप्रकरणी मंगळवारी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

कोलकाता इथल्या राधा गोविंद कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ९ ऑगस्टला प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर देशात संतापाची लाट उसळली असून ठिकठिकाणी निदर्शनं केली जात आहेत, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयनं करावा, असे आदेश कोलकाता उच्च न्यायालयानं दिले आहेत.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात, बुलंदशहर जिल्ह्यातल्या सालेमपूर भागात एक बस आणि पिकअप यांची धडक होऊन १० जणांचा मृत्यू झाला तर ३७ जण जखमी झाले. अपघातग्रस्त पिकअपमधले कामगार गाझियाबादहून रक्षाबंधनाच्या सणासाठी अलीगड जिल्ह्यातल्या रायपूर या गावी निघाले होते.

जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे, तर चार गंभीर जखमींना मेरठ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेची दखल घेत जखमींना तात्काळ योग्य ते उपचार पुरवण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**<><><><><>**

जगातल्या वाढत्या मंकीपॉक्स प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर बांग्लादेश सरकारनं मंकीपॉक्स चा संसर्ग देशांतून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे.  ढाका इथल्या हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळावर कालपासून या प्रवाशांचे तापमान तपासणी सुरु करण्यात आली आहे.

चीनने मंकीपॉक्स विषाणूचा प्रसार रोखण्यासाठीचे प्रयत्न वाढवले आहेत. या महिन्याच्या १५ तारखेपासून सहा महिन्यांसाठी, मंकीपॉक्सचा संसर्ग असलेल्या देशांमधून चीनमध्ये येणाऱ्या लोकांना त्यांच्या प्रकृतीबद्दल सीमाशुल्क विभागाला कळवावं लागेल.

आफ्रिकेतल्या मंकीपॉक्सच्या प्रकरणांमध्ये वाढ होतं असून जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सला जागतिक आरोग्य आणीबाणी घोषित केलं आहे. दरम्यान, सध्या भारतात मंकीपॉक्सचं एकही प्रकरण समोर आलेलं नसल्याचं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मलेशियाचे प्रधानमंत्री दातो सेरी अन्वर बिन इब्राहीम उद्यापासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी मंगळवारी ते द्विपक्षीय चर्चा करतील असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. त्यांच्या या पहिल्याच भारत भेटी दरम्यान ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांची भेट घेतील. दोन्ही देशांमधले ऐतिहासिक आणि सामाजिक-सांस्कृतीक संबंध मजबूत असून २०१५ मध्ये प्रधानमंत्री मोदी यांच्या भेटी दरम्यान हे संबंध धोरणात्मक भागीदारीच्या स्तरावर पोहोचले होते.

**<><><><><>**

राज्य शासनाचा मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा यंदा मुंबईत वरळीच्या डोम एसव्हीपी स्टेडियममध्ये येत्या बुधवारी संध्याकाळी ६ वाजता आयोजित केला आहे. यावेळी ५८ व्या आणि ५९ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचं वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते केलं जाणार आहे.

त्याचबरोबर २०२३ चा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना, तर राज कपूर जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेत्री

आशा पारेख यांना या पुरस्कार सोहोळ्यात प्रदान केला जाईल. १० लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह, असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे. यासोबतच, २०२३ चा चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक-दिग्दर्शक, अभिनेते दिग्पाल लांजेकर यांना, तर  राज कपूर विशेष योगदान पुरस्कार जेष्ठ दिग्दर्शक एन.चंद्रा यांना प्रदान केला जाणार आहे. ६ लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२४ प्रख्यात गायिका अनुराधा पौडवाल यांना प्रदान केला जाईल. चित्रपटांसाठी ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना, तर गायनासाठी सुदेश भोसले यांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ नं सन्मानित केलं जाईल.

**<><><><><>**

मराठी विज्ञान परिषदेतर्फे विज्ञान आणि तंत्रज्ञानक्षेत्रातल्या योगदानासाठी दिले जाणारे ‘मविप जीवन गौरव पुरस्कार’ जाहीर झाले आहेत. यावर्षी डॉ. रघुनाथ माशेलकर पुरस्काराकरता प्रा. रोहिणी गोडबोले आणि डॉ. अजय सूद यांची, तर डॉ. कमला सोहोनी पुरस्काराकरता डॉ. माधव गाडगीळ, आणि डॉ. महताब बामजी यांची निवड झाली आहे. मराठी विज्ञान परिषदेच्या ५९ व्या वार्षिक अधिवेशनात १६ नोव्हेंबरला हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><><>**

झारखंड मुक्ती मोर्च्यात आपला अपमान झाल्याचा आरोप झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी केला आहे. हेमंत सोरेन यांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर आपल्याला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यायला भाग पाडल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

पक्षाला नुकसान पोचवण्याचा आपला हेतू नाही. मात्र झारखंड मुक्ती मोर्चा बळकट करण्यासाठी आपण त्याग केला होता. त्यामुळे या प्रकारानं आपण दुखावलो असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**